आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर वाचा एका क्लिकवर www.dainiklaturprabhat.in







# दैनिक लातूर प्रभात


E-mail :- laturprabhat@gmail.com

मुख्य संपादक : रघुनाथ बनसोडे मो.नं.८८३०२ ५०६४५,

RNI No.:- MAHMAR/2017/72894 ● वर्ष १० वे ● अंक २४५ वा ● गुरुवार १८ जून २०२६ ● किंमत २ रुपया ● पाने ४ ●







## ईडब्ल्यूएस आरक्षणासाठी आमदार अभिमन्यू पवारांचा पाठपुरावा; देवेंद्र फडणवीसांच्या शिफारशीची केंद्रीय शिक्षणमंत्र्यांकडून दखल

औसा : देशातील केंद्रीय विद्यालये आणि जवाहर नवोदय विद्यालयांमध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (ईडब्ल्यूएस) विद्यार्थ्यांना नियमानुसार १० टक्के आरक्षणाचा लाभ मिळावा, यासाठी आमदार अभिमन्यू पवार यांनी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. यावेळी त्यांनी या मागणीसंदर्भातील निवेदन सादर करत ग्रामीण व आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हितासाठी आवश्यक धोरणात्मक निर्णय घेण्याची मागणी केली.



महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील, शेतकरी कुटुंबांतील तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील अनेक गुणवंत विद्यार्थी केवळ आर्थिक अडचणींमुळे दर्जेदार शिक्षणाच्या संधींपासून वंचित राहत असल्याची बाब आमदार पवार यांनी शिक्षणमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिली. राष्ट्रीय स्तरावर गुणवत्तापूर्ण आणि स्पर्धात्मक शिक्षण देणाऱ्या केंद्रीय विद्यालये तसेच जवाहर नवोदय विद्यालयांमध्ये अशा विद्यार्थ्यांना न्याय्य प्रतिनिधित्व मिळणे गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले.याच पार्श्र्वभूमीवर देशातील सर्व केंद्रीय विद्यालयांमध्ये तसेच जवाहर नवोदय विद्यालयांमध्ये ईडब्ल्यूएस विद्यार्थ्यांसाठी १० टक्के आरक्षणाची तरतूद करण्यात यावी, अशी मागणी आमदार अभिमन्यू पवार यांनी केली. या निर्णयामुळे ग्रामीण आणि आर्थिकदृष्ट्या मागास कुटुंबांतील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणाची संधी उपलब्ध होऊन सामाजिक न्यायाची संकल्पना अधिक प्रभावीपणे राबविली जाईल, असे त्यांनी सांगितले.

दरम्यान, या विषयाबाबत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही सकारात्मक भूमिका घेत केंद्रीय शिक्षणमंत्र्यांना पत्राद्वारे विनंती केली होती. मंगळवारी झालेल्या भेटीदरम्यान मुख्यमंत्री फडणवीस यांनी या मागणीसंदर्भातील शिफारसपत्र केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्याकडे सादर केले.या मागणीकडे सकारात्मक दृष्टीने पाहत केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी संबंधित विभागाकडून प्रस्ताव मागवून पुढील कार्यवाही करण्याचे निर्देश दिल्याची माहिती आमदार अभिमन्यू पवार यांनी दिली. ईडब्ल्यूएस विद्यार्थ्यांना समान संधी आणि आरक्षणाचा लाभ मिळावा, यासाठी पुढेही सातत्याने पाठपुरावा करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या विषयाची दखल घेत केंद्र सरकारकडे शिफारस केल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे तसेच मागणीचा सकारात्मक विचार केल्याबद्दल केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांचे आमदार अभिमन्यू पवार यांनी मनःपूर्वक आभार मानले.

## बालकांना पोषणासह चविष्ट आहार; घरपोच आहारात नव्या पाककृतींचा होणार समावेश - मंत्री आदिती तटकरे

मुंबई, दि. १७ : अंगणवाडीतील बालकांसह गरोदर महिला, स्तनदा माता तसेच आकांक्षित जिल्ह्यांतील किशोरवयीन मुलींना देण्यात येणाऱ्या घरपोच आहारामध्ये पोषणमूल्यांसोबतच चवीलाही प्राधान्य देत नवीन आणि रुचकर पाककृतींचा समावेश करण्यात आला आहे, अशी माहिती महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली. एकात्मिक बाल विकास सेवा योजना अंतर्गत राज्यातील ६ महिने ते ३ वर्षे वयोगटातील बालके, गरोदर महिला, स्तनदा माता तसेच आकांक्षित जिल्ह्यांतील किशोरवयीन मुलींना देण्यात येणाऱ्या घरपोच आहारासंदर्भात मंत्रालयात आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मंत्री तटकरे यांनी स्वतः पोषण आहाराच्या गुणवत्तेची तपासणी केली. बैठकीस महिला व बालविकास विभागाचे सचिव डॉ. अनुपकुमार यादव, आयुक्त माधवी सरदेशमुख, आयुक्त डॉ. जगदीश मणियार (दूरदृश्य प्रणालीद्वारे), सहसचिव वी. आर. ठाकूर, अवर सचिव सुनील सरदार, प्रसाद कुलकर्णी, सह आयुक्त वर्षा पवार, उपायुक्त संगीता लोंढे, विजय क्षीरसागर, जामसिंग गिरासे यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.



मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, केंद्र शासनाच्या निकषानुसार सध्या घरपोच आहार प्रीमिक्स स्वरूपात वितरित केला जातो. मात्र, लाभार्थ्यांकडून मिळालेला प्रतिसाद, क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या सूचना तसेच तज्ज्ञांच्या शिफारशी लक्षात घेऊन या आहारामध्ये महत्त्वपूर्ण बदल करण्यात आले आहेत. सध्याच्या 'एनर्जी डेन्स मूग डाळ खिचडी प्रीमिक्स'मधील घटकांच्या मिश्रणात सुधारणा करण्यात आली असून आहाराचा दर्जा अधिक चांगला राखण्यासाठी मसाल्याचे पाकीट स्वतंत्रपणे उपलब्ध करून देण्यात येणार आहे. याशिवाय 'मल्टी मिक्स सिरियल्स अँड प्रोटीन्स' ही पाककृती कायम ठेवण्यात आली आहे. तसेच 'व्हेज पुलाव' आणि 'मल्टीग्रेन पफ' या दोन नवीन पाककृतींचा समावेश करण्यात आला आहे.

या बदलांमुळे लाभार्थ्यांना आता अधिक पौष्टिक आणि रुचकर पाककृतींचा घरपोच आहार उपलब्ध होणार आहे. सर्व पाककृतींमध्ये केंद्र शासनाने निर्धारित केलेल्या प्रमाणात उष्मांक, प्रथिने आणि आवश्यक सूक्ष्म पोषकतत्त्वांचा (मायक्रोन्यूट्रिएंट्स) समावेश करण्यात आला आहे. राज्यातील कुपोषण कमी करण्यासाठी शासन सातत्याने विविध उपाययोजना राबवत असून मागील तीन वर्षांत कुपोषणाच्या प्रमाणात लक्षणीय घट झाली आहे.

नव्याने समाविष्ट करण्यात आलेल्या पाककृतींमुळे लाभार्थ्यांची आहाराबाबतची स्वीकृती वाढेल आणि कुपोषण कमी करण्याच्या प्रयत्नांना अधिक बळ मिळेल, असा विश्र्वास त्यांनी व्यक्त केला. आहाराबाबत माहिती देताना डॉ. अनुपकुमार यादव म्हणाले की, आहारामध्ये बदल करण्यापूर्वी राज्यभर सर्वेक्षण करण्यात आले. तसेच वैद्यकीय अधिकारी, आहारतज्ज्ञ आणि विविध विशेषज्ञ संस्थांची मते जाणून घेण्यात आली. क्षेत्रीय यंत्रणांशी झालेल्या चर्चे दरम्यान या नवीन पाककृतींना लाभार्थ्यांचा सकारात्मक प्रतिसाद मिळेल.

## नीट यूजी पुनर्परीक्षा सुरळीत, पारदर्शक व निर्विघ्न पार पाडण्यासाठी लातूर पोलिसाची कठोर व प्रभावी उपाययोजना

लातूर : देशातील लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याशी निगडित



असलेली नीट यूजी पुनर्परीक्षा (ठश-छएएढ) दिनांक २१ जून २०२६ रोजी पार पडत आहे. परीक्षेची पारदर्शकता, गोपनीयता आणि विश्र्वासार्हता अबाधित राखण्यासाठी लातूर जिल्हा पोलीस दलाकडून अभूतपूर्व सुरक्षा व्यवस्था उभारण्यात आली असून परीक्षेच्या प्रत्येक टप्प्यावर बारकाईने लक्ष ठेवण्यात येत आहे.

पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली परीक्षेपूर्वी सर्व बंदोबस्त अधिकारी, जिल्हा समन्वय अधिकारी, संपर्क अधिकारी, केंद्र अधीक्षक, वाहतूक नियंत्रण अधिकारी, एस्कॉर्ट पथके तसेच परीक्षा केंद्रांवरील समन्वय अधिकारी यांची विशेष बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत परीक्षेचे राष्ट्रीय स्तरावरील महत्त्व, संवेदनशीलता आणि जबाबदारी अधोरेखित करत प्रत्येक अधिकाऱ्याने अत्यंत सतर्कतेने कर्तव्य बजावण्याच्या सूचना देण्यात आल्या.

परीक्षेच्या प्रश्र्नपत्रिका व गोपनीय साहित्याच्या वाहतुकीसाठी विशेष पोलीस एस्कॉर्टची नियुक्ती करण्यात आली असून साहित्याच्या सुरक्षित हालचालीवर सतत देखरेख ठेवण्यात येत आहे. परीक्षा केंद्र परिसरात बहुस्तरीय सुरक्षा व्यवस्था उभारण्यात आली असून प्रत्येक केंद्रावर पुरेशा प्रमाणात पोलीस अधिकारी व अंमलदार तैनात करण्यात आले आहेत.

परीक्षा केंद्रांच्या परिसरात संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी विशेष गस्त पथके कार्यरत असून कोणत्याही प्रकारच्या गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी कडक प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात आल्या आहेत. परीक्षा केंद्रांजवळील गर्दी नियंत्रण, वाहतूक व्यवस्थापन तसेच आपत्कालीन परिस्थितीला तत्काळ प्रतिसाद देण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली आहे.

बंदोबस्तात सहभागी असलेल्या पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना कर्तव्यादरम्यान मोबाईल अथवा इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणांचा वापर करण्यास मनाई करण्यात आली असून त्याऐवजी प्रभावी संपर्कासाठी वॉकी-टॉकी संच उपलब्ध करून देण्यात आले आहेत. त्यामुळे सुरक्षा व्यवस्थेमध्ये कोणत्याही प्रकारचा अडथळा निर्माण होणार नाही याची दक्षता घेण्यात आली आहे.

पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी स्पष्ट निर्देश दिले आहेत की, परीक्षेच्या प्रक्रियेत कोणत्याही स्तरावर निष्काळजीपणा, हलगर्जीपणा किंवा तडजोड खपवून घेतली जाणार नाही. अशा प्रकारची बाब निदर्शनास आल्यास संबंधितांविरुद्ध कठोर कारवाई करण्यात येईल. लातूर जिल्हा पोलीस दल विद्यार्थ्यांचे भविष्य सुरक्षित ठेवण्याच्या या राष्ट्रीय कर्तव्यात पूर्ण जबाबदारीने सहभागी झाले असून नीट यूजी पुनर्परीक्षा शांततापूर्ण, पारदर्शक आणि निर्विघ्न वातावरणात पार पडण्यासाठी लातूर पोलीस यंत्रणा सज्ज आहे.

## विधान परिषद निवडणुकीनिमित्त लातूर जिल्ह्यात दोन दिवस मद्यविक्री बंद

लातूर, (जिमाका): उस्मानाबाद-लातूर-बीड विधान परिषद स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघ द्विवार्षिक निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर लातूर जिल्ह्यात दोन दिवस मद्यविक्री बंद राहील. निवडणूक खुल्या, मुक्त आणि निर्भय वातावरणात पार पाडण्यासाठी तसेच जिल्ह्यात सार्वजनिक शांतता व कायदा-सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी लातूरचे जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी मद्य विक्री बंदीचे सुधारित आदेश जारी केले आहेत. लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ मधील कलम १३५ (सी) आणि महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ चे कलम १४२ (१) अन्वये देण्यात आलेल्या या सुधारित आदेशानुसार, प्रत्यक्ष मतदानाच्या दिवशी म्हणजेच गुरुवार, १८ जून २०२६ रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ वाजेपर्यंत आणि मतमोजणीच्या दिवशी, सोमवार, २२ जून २०२६ रोजी मतमोजणीच्या ठिकाणी प्रक्रिया पूर्ण संपेपर्यंत मद्य विक्री पूर्णपणे बंद ठेवण्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

हा आदेश लातूर जिल्ह्यातील प्रत्यक्ष मतदान व मतमोजणी होत असलेल्या सर्व संबंधित क्षेत्रांना लागू राहणार आहे. यामध्ये लातूर महानगरपालिका हद्दीसह रेणापूर, अहमदपूर, जळकोट, चाकूर, उदगीर, शिरूर अनंतपाळ, देवणी, औसा आणि निलंगा या सर्व नगर पंचायत हद्दींचा समावेश आहे. या सर्व नमूद क्षेत्रांमध्ये स्थित असलेल्या सर्व देशी आणि विदेशी मद्याची घाऊक व किरकोळ विक्री, तसेच ताडी विक्री अनुज्ञप्ती (नमुना एफएल-१, एफएल-२, एफएल-३, एफएल-४ क्लब अनुज्ञप्ती, सीएल-२, सीएल-३, टिओडी-३, टिडी-१ इत्यादी सर्व प्रकारची दुकाने) या आदेशित कालावधीत पूर्णपणे बंद राहतील.

सर्व संबंधित मद्य विक्री अनुज्ञप्तीधारकांनी या आदेशाची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे बंधनकारक आहे. या आदेशाचे पालन करण्यात कोणत्याही प्रकारची कसूर झाल्यास संबंधितांवर कडक कायदेशीर कारवाई करण्यात येईल. तसेच, महाराष्ट्र दारुबंदी कायदा, १९४९ चे कलम ५४ व ५६ मधील तरतुदीनुसार संबंधितांचा परवाना कायमस्वरूपी रद्द करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

## विधान परिषद निवडणूक : लातूर जिल्ह्यात ३६७ मतदार बजाविणार हक्क

लातूर, दि. १७ (जिमाका): उस्मानाबाद-लातूर-बीड विधान परिषद स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघ द्विवार्षिक निवडणुकीसाठी गुरुवार, १८ जून २०२६ रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ वाजेपर्यंत मतदान होणार आहे. यासाठी प्रत्येक तालुकास्तरावर मतदान केंद्रांची निर्मिती करण्यात आली असून जिल्ह्यातील ३६७ मतदार यावेळी आपला हक्क बजाविणार आहेत. मतदान प्रक्रिया भयमुक्त आणि पारदर्शक वातावरणात पार पाडण्यासाठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज झाली आहे.

रेणापूर येथील तहसील कार्यालयातील मिटिंग हॉल (२५ मतदार), अहमदपूर येथील तहसील कार्यालयातील निवासी नायब तहसीलदार यांचे दालन (३५ मतदार), जळकोट येथील तहसील कार्यालयातील मिटिंग हॉल (२३ मतदार), चाकूर येथील तहसील कार्यालयातील मिटिंग हॉल (२५ मतदार), लातूर येथील तहसील कार्यालयातील महसूल हॉल (८८ मतदार), उदगीर येथील प्रशासकीय भवन इमारतीतील तळ मजला खोली क्र. २ (५३ मतदार), शिरूर अनंतपाळ येथील तहसील कार्यालयातील व्ही. सी. रूम (२२ मतदार), देवणी येथील तहसील कार्यालयातील मिटिंग हॉल (२३ मतदार), औसा येथील तहसील कार्यालयातील मिटिंग हॉल (३६ मतदार) आणि निलंगा येथील तहसील कार्यालयातील महसूल हॉल (३७ मतदार) येथे मतदान केंद्रांची निर्मिती करण्यात आली आहे.

## राजधानीत महाराणा प्रतापसिंह यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन

नवी दिल्ली, १७ : मेवाडचे क्रांतीसूर्य राजे महाराणा प्रतापसिंह यांच्या जयंतीनिमित्त त्यांना आज राजधानीत अभिवादन करण्यात आले. कोपर्निकस मार्गस्थित महाराष्ट्र सदनातील सभागृहात आयोजित कार्यक्रमात निवासी आयुक्त तथा सचिव श्र्वेता सिंघल यांनी राजे महाराणा प्रतापसिंह यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले. यावेळी, महाराष्ट्र परिचय केंद्राचे संचालक हेमराज बागुल, सहाय्यक निवासी आयुक्त नितीन शेंडे, जनसंपर्क अधिकारी मनीषा पिंगळे, सहायक लेखा अधिकारी निलेश केदारे, निवासी उपअभियंता जमुनाप्रसाद गंगवार, व्यवस्थापक प्रमोद कोलपत्ते यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचाऱ्यांनीही प्रतिमेस पुष्प अर्पण करून आदरांजली वाहिली.

याप्रसंगी व्यवस्थापक प्रमोद कोलपत्ते यांनी मेवाडचे क्रांतीसूर्य राजे महाराणा प्रतापसिंह यांच्या जीवनकार्याचा परिचय करून दिला.

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भारताचे सर्वांगीण परिवर्तन-माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर

लातूर /प्रतिनिधीः- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्र सरकारने गत बारा वर्षात देशाच्या सर्वांगीण विकासाला गती दिली असून या बारा वर्षात भारताची जागतीक पातळीवरील प्रतिष्ठा उंचाविण्यासह आर्थिक, सामाजिक, पायाभूत आणि सांस्कृतीक क्षेत्रात व्यापक परिवर्तन घडवून आणले आहे. त्यामुळे देशाच्या सर्वसामान्य जनतेला दिलासा मिळालेला असून त्यांच्याही जीवनात परिवर्तन घडून आले असल्याची माहिती माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी दिली आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्र सरकारला बारा वर्ष पुर्ण झाले असून या कार्यकाळात झालेल्या विविध निर्णयाची व कार्याची माहिती देण्यासाठी आयोजित पत्रकार परिषदेत माजी मंत्री आ. निलंगेकर बोलत होते. यावेळी लातूर शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांची उपस्थिती होती.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सलग ४,३९८ पेक्षा अधिक दिवस देशाचे नेतृत्व करत सर्वाधिक काळ कार्यरत असलेले निर्वाचीत पंतप्रधान म्हणून नवा विक्रम प्रस्तापित केला असल्याची माहिती देऊन माजी मंत्री आ. निलंगेकर म्हणाले की त्यांच्या नेतृत्वात गत १२ वर्षात भारताने विविध क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती साधलेली आहे. सुमारे २५ कोटी नागरीकांना गरिब रेषे बाहेर काढण्यात यश आले असून ८१ कोटी नागरीकांना मोफत अन्न-धान्याचा लाभ देण्यात आला आहे. देशाच्या पंतप्रधान पदाची



सुत्रे हाती घेतल्यानंतर मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्र सरकारने शेतकर्यांसाठी नमो शेतकरी सन्मान योजना सुरु करण्याचा निर्णय घेत शेतकर्यांना सक्षम बनविण्यासाठी ठोस पाऊले उचलेली होती. महिला सक्षमीकरणासाठी अनेक योजना सुरु करत लखपती दिदी योजनेच्या माध्यमातून महिलांना स्वालंबी करण्याचा महत्वपुर्ण निर्णय घेण्यात आलेला आहे. याचा लाभ देशातील ३ कोटी महिलांना झाला असल्याचे आ. निलंगेकर यांनी सांगितले.

गत १२ वर्षात केंद्र सरकारच्या माध्यमातून राज्यासह मराठवाड्याच्या विकासाला गती मिळण्यासाठी कोट्यावधी रुपयाचा निधी उपलब्ध झाला असून याचा लाभ लातूर जिल्ह्यालाही मिळाला असल्याचे सांगून आ. निलंगेकर म्हणाले की, देशातील चौथा आणि महाराष्ट्रील पहिला रेल्वे बोगी प्रकल्प लातूरात सुरु झालेला असून लवकरच या ठिकाणी प्रत्यक्षात उत्पादन सुरु होईल असे सांगितले. २०१४ पुर्वी लातूर जिल्ह्यात एकही राष्ट्रीय महामार्ग नव्हता आता लातूरला चार राष्ट्रीय महामार्ग मिळाले असून दोन लवकरच सुरु होतील असा विश्र्वासही यांनी व्यक्त केला. देशातील प्रत्येक नागरीक या १२ वर्षात केंद्र सरकारच्या एकातरी योजनाचा लाभार्थी असून आगामी काळातही देशाला सर्वोच्च स्थानी नेण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्र सरकार कटीबद्ध असेल अशी ग्वाही आ. निलंगेकर यांनी दिली. सध्या जगात आर्थिक मंदी असली तरी भारताला त्याचा कोणताही फटका बसलेला नसून देशाची आर्थिक व्यवस्था मजबूत करत जगातील चौथी मोठी अर्थव्यवस्था म्हणून भारताची ओळख निर्माण झाली असल्याचे आ. निलंगेकर यांनी स्पष्ट केले. लातूर जिल्ह्याला आगामी काळात केंद्र सरकारच्या माध्यमातून अनेक विकासाचे कामे मंजूर होतील असे सांगून लवकरच नवीन पाच रेल्वेही लातूरला मिळणार असल्याची माहिती माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी यावेळी दिली.

भाजपा लातूर शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी प्रास्ताविक करताना लातूर शहराला केंद्र सरकारच्या माध्यमातून मिळालेल्या विविध लाभांची माहिती दिली. या पत्रकार परिषदेला शहर जिल्हा सरचिटणीस प्रविण कस्तुरे, संजय गिर, निखील गायकवाड, रागिणी यादव, प्रमोद गुडे यांची उपस्थिती होती.


आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर वाचा एका क्लिकवर www.dainiklaturprabhat.in

## ‘नीट’ परीक्षेसाठी लातूर जिल्हाधिकारी कार्यालयात नियंत्रण कक्ष स्थापन

लातूर, दि. १७ : राष्ट्रीय परीक्षा एजेंसीमार्फत नीट युजी २०२६ ही परीक्षा रविवार, २१ जून २०२६ रोजी दुपारी २ ते सायंकाळी ५ या कालावधीत आयोजित करण्यात आली आहे. या परीक्षेच्या कामकाजासाठी आणि आवश्यक समन्वयासाठी लातूरचे जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टवोड यांच्या निर्देशानुसार जिल्हाधिकारी कार्यालयात विशेष नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला आहे. या नियंत्रण कक्षाचे प्रमुख म्हणून तहसीलदार (संगायो) राजाभाऊ कदम (भ्रमणध्वनी क्र. ९९२२८४२००१) यांची, तर नियंत्रण कक्ष सहाय्यक म्हणून जिल्हा परिषदेचे शिक्षण विस्तार अधिकारी मधुकर ढमाले (भ्रमणध्वनी क्र. ९४०५२८१०९८) यांची नियुक्ती करण्यात आली आहे. परीक्षार्थी, पालक आणि संबंधित यंत्रणांच्या सोयीसाठी या नियंत्रण कक्षाचा दूरध्वनी क्रमांक ०२३८२-२२०२०४ असा आहे.

परीक्षेशी संबंधित विविध विभागांच्या समन्वयासाठी आरोग्य विभाग, पोलीस दल, लातूर महानगरपालिका, महावितरण, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ आणि तंत्रशिक्षण संस्था अशा विविध विभागांतील एकूण ८ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची नियुक्ती या नियंत्रण कक्षात करण्यात आली आहे. हे सर्व नियुक्त अधिकारी व कर्मचारी २० आणि २१ जून २०२६ रोजी सकाळी १०.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत दोन्ही दिवस जिल्हाधिकारी कार्यालयातील नियंत्रण कक्षात उपस्थित राहून परीक्षेच्या अनुषंगाने प्राप्त होणाऱ्या तक्रारींचे निवारण करतील.

## आपत्कालीन परिस्थितीत कीर्ती ऑइल मिलची मनपास मदत

लातूर/ प्रतिनिधी : आगीसारख्या भीषण दुर्घटना घडल्यानंतर निर्माण होणाऱ्या आपत्कालीन परिस्थितीत कीर्ती ऑइल मिलने लातूर महानगरपालिकेस वारंवार मदत केली आहे. काही दिवसांपूर्वी एमआयडीसी परिसरात आग लागली असतानाही कीर्ती ऑइल मिलने महानगरपालिकेस पाणीपुरवठा करून केली.

एमआयडीसी परिसरातील एका कंपनीत काही दिवसांपूर्वी आग लागली होती. त्याची माहिती पालिकेला मिळाल्यानंतर अग्निशमन विभागाचे अधिकारी व कर्मचारी वाहनांसह तात्काळ घटनास्थळी रवाना झाले. प्रत्यक्ष पाहणी केली असता आग भीषण स्वरूपाची असल्याचे लक्षात आले. आगीचे रौद्र रूप पाहून अन्य अग्निशमन वाहनांनाही पाचारण करण्यात आले.

आग विझविण्यासाठी कंपनीच्या चारही बाजूंनी पाण्याचा मारा करणे गरजेचे होते. परंतु पाण्याची क्षमता कमी असल्याचे लक्षात आल्यानंतर याच परिसरात असणाऱ्या कीर्ती ऑइल मिलशी संपर्क करण्यात आला. आग विझविण्यासाठी कीर्ती ऑइल मिलने सलग दोन दिवस पाण्याची मदत केली.

यापूर्वीही एमआयडीसी परिसरात आग लागण्याच्या घटना घडलेल्या आहेत. त्यावेळी देखील कीर्ती ऑइल मिलने आग विझवण्यासाठी पाणीपुरवठा केलेला आहे. दुर्घटनांच्या समयी कीर्ती ऑइल मिल कडून मनपा प्रशासनास वारंवार मदत करण्यात आली आहे. यामुळेच एमआयडीसी परिसरात लागलेल्या आगीवर नियंत्रण मिळविणे पालिकेला सोयीचे ठरत आले आहे.

## सीईटी (पीसीएम) परीक्षेत राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलाचे उज्ज्वल यश

लातूर : एमएचटी-सीईटी (पीसीएम) परीक्षेच्या पहिल्या सत्राचा निकाल नुकताच जाहीर झाला असून या परीक्षेत राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलातील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यशाची परंपरा कायम राखली आहे. महाविद्यालयातील ३१ विद्यार्थी या परीक्षेत यश संपादन केले आहे.

सोनाली शरद पंचगल्ले ही विद्यार्थिनी ९९.६४ पर्सेंटाईल गुण मिळवत महाविद्यालयात प्रथम, व्यंकटेश विजयकुमार लड्डा ९६.९२ पर्सेंटाईल द्वितीय तर सार्थक चंद्रकांत वाडकर हा ९६.५५ पर्सेंटाईल गुण मिळवत महाविद्यालयात तृतीय आला आहे. तसेच श्रेया गजानन क्षीरसागर ९३.०४ पर्सेंटाईल, विवेक मुकुंद भोसले ९१.०२, कृष्णा विजयकुमार किसवे ९०, सृष्टी बाहेती ८७, श्रुती खटके ८३.२६, अखिलेश काळे ८३.००, तन्वी आलापूरे ८१.२२, पूजा किसवे ८०.१०, अदिती पांढरे ८०.००, ओमकार मोहिते ७३.११, अस्मीत फुलारी ७३.००, वैष्णवी मोरे ७२.००, प्राप्ती वरवटे ७०.००, करण खुपसे ६७.००, संजय सारडा ६६.००, यशश्री कद्दू ६५.००, आरुष वायकर ६४.००, प्रणव वाघमारे ६१.००, पृथ्वीराज चव्हाण ५९.००, सिध्दी रुद्रवार ५९.००, केशव गवाले ५०.००, प्रणव निंबुरगे ४५.००, गायत्री तांदळे ४०.००, मीनाक्षी काळे ३८.००, सृष्टी सूर्यवंशी ३८.००, अथर्व जाधव ३८.००, मानसी काळे ३७.००, तर आदित्य चव्हाण याने ३५.०० पर्सेंटाईलगुण मिळवले आहेत. या यशाबद्दल शिक्षक आमदार विक्रम काळे, शिक्षण उपसंचालक दीपक चवने, शिक्षण सहसंचालक संजय पंचगल्ले, माध्यमिकचे शिक्षणाधिकारी संजय क्षीरसागर, प्राथमिकच्या शिक्षणाधिकारी तृप्ती अंधारे, संस्थेच्या अध्यक्षा के. ए. जायेभाये, सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे, प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, उपप्राचार्य कविता केंद्रे, मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, संचालक अश्विनी केंद्रे, प्रा. वैशाली केंद्रे, समन्वयक राजीव मुंढे, प्रा. बी. बी. खटके, प्रा. एस. एस. खोत, प्रा. वैशाली पाटील, प्रा. डी. ए. फंड, परमेश्वर गित्ते, विष्णू कराड, शिवकांत वाडीकर आदींनी कौतुक केले आहे.

# महाराष्ट्राच्या राजकीय घडामोडी एक !

## संपादकीय...

महाराष्ट्राचे राजकारण हे देशातील सर्वाधिक गतिमान आणि प्रभावशाली राजकारण मानले जाते. गेल्या काही वर्षांत राज्यातील राजकीय घडामोडींनी सातत्याने नवीन वळणे घेतली आहेत. सत्तांतर, पक्षफुटी, आघाड्यांची पुनर्रचना आणि नेतृत्वातील बदल यामुळे महाराष्ट्राचे राजकारण चर्चेच्या केंद्रस्थानी राहिले आहे.

राज्यातील मतदारांनी अनेक वेळा वेगवेगळ्या पक्षांना संधी दिली आहे. मात्र अलीकडील काळात निवडणुकीपूर्वी दिलेली आश्र्वासने आणि निवडणुकीनंतर होणाऱ्या राजकीय समीकरणांमुळे मतदारांमध्ये संभ्रम निर्माण झाल्याचे दिसून येते. राजकारणातील नैतिकता आणि जनतेचा विश्र्वास हा महत्त्वाचा मुद्दा बनला आहे.

एका बाजूला विकास, पायाभूत सुविधा, उद्योग आणि गुंतवणूक यांसारख्या विषयांवर सरकार भर देत आहे. मुंबई, पुणे, नागपूर आणि इतर शहरांमध्ये अनेक विकासकामे सुरू आहेत. समृद्धी महामार्ग, मेट्रो प्रकल्प आणि औद्योगिक गुंतवणूक यामुळे विकासाचा वेग वाढल्याचा दावा केला जातो. दुसऱ्या बाजूला शेतकरी, बेरोजगारी, महागाई आणि पाणीटंचाई यांसारखे प्रश्न अजूनही गंभीर आहेत. ग्रामीण भागातील अनेक नागरिकांना मूलभूत सुविधांसाठी संघर्ष करावा लागत आहे. कृषी क्षेत्रातील अनिश्र्चितता आणि उत्पादन खर्चातील वाढ यामुळे शेतकरी चिंतेत आहेत.

राजकीय पक्षांतील अंतर्गत संघर्षही राज्याच्या राजकारणावर परिणाम करत आहेत. पक्षांमधील गटबाजी आणि नेतृत्वासाठीची स्पर्धा यामुळे अनेकदा राजकीय अस्थिरता निर्माण होते. याचा परिणाम प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर होण्याची शक्यता असते. लोकशाही व्यवस्थेत विरोधी पक्षाची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. सत्ताधारी पक्षाच्या निर्णयांवर लक्ष ठेवणे आणि जनतेच्या प्रश्नांना वाचा फोडणे हे विरोधी पक्षाचे कर्तव्य आहे. महाराष्ट्रात विरोधी पक्ष विविध मुद्द्यांवर सरकारला धारेवर धरत आहे. त्याचवेळी सरकारनेही टीका स्वीकारून जनहिताचे निर्णय घेणे आवश्यक आहे. सकारात्मक संवाद आणि विधायक राजकारणामुळे लोकशाही अधिक मजबूत होते.

राजकीय संघर्ष हा लोकशाहीचा भाग असला तरी तो जनहिताच्या मर्यादेत राहणे गरजेचे आहे. महाराष्ट्राची सामाजिक आणि सांस्कृतिक परंपरा समृद्ध आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा वारसा या राज्याला लाभला आहे. त्यामुळे राज्यातील राजकारणाने विकास, पारदर्शकता आणि जनकल्याण यांना प्राधान्य देणे अपेक्षित आहे. युवकांचा वाढता राजकीय सहभाग ही एक सकारात्मक बाब आहे. सामाजिक माध्यमांमुळे राजकीय जागरूकता वाढली आहे. तरुण पिढी आता केवळ आश्र्वासनांवर विश्र्वास न ठेवता कामगिरीच्या आधारे नेत्यांचे मूल्यमापन करत आहे.

महिलांचा राजकारणातील सहभागही वाढत आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांपासून ते विधानसभेपर्यंत महिलांची उपस्थिती अधिक प्रभावी होत आहे. ही लोकशाहीच्या बळकटीसाठी महत्त्वाची बाब आहे. राजकारणात व्यक्तिकेंद्रिततेपेक्षा धोरणकेंद्रित चर्चा होणे आवश्यक आहे. शिक्षण, आरोग्य, रोजगार, पर्यावरण आणि शेती यांसारख्या विषयांवर अधिक भर दिला गेला पाहिजे. यामुळे राज्याच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळेल. आज महाराष्ट्र एका महत्त्वाच्या टप्प्यावर उभा आहे. राजकीय स्थैर्य आणि विकास यांचा समतोल राखणे ही काळाची गरज आहे. जनतेच्या अपेक्षा मोठ्या आहेत आणि त्या पूर्ण करण्यासाठी सर्व पक्षांनी जबाबदारीने वागणे आवश्यक आहे. शेवटी, महाराष्ट्राच्या राजकीय घडामोडी या केवळ सत्तासंघर्षापुरत्या मर्यादित नसून त्या राज्याच्या भविष्याशी निगडित आहेत.

जनतेचा विश्र्वास, लोकशाही मूल्यांचे रक्षण आणि सर्वसमावेशक विकास हेच कोणत्याही राजकीय व्यवस्थेचे अंतिम उद्दिष्ट असले पाहिजे. महाराष्ट्राचे राजकारण या दिशेने वाटचाल करेल, अशीच अपेक्षा राज्यातील नागरिक व्यक्त करत आहेत.

# अल निनो संकटाचा सामना; शेतकऱ्यांची सतर्कता आवश्यक

‘अल निनो’ हा शब्द महाराष्ट्रातील तमाम शेतकऱ्यांनी समजून घेणे आवश्यक आहे.अल निनो हे एक वातावरणीय संकट असून आता या संकटाच्या आम्ही जवळ असून याचा सर्वाधिक परिणाम जून मध्ये मृग आणि रोहिणी नक्षत्रावर झाला आहे. तो पुढेही होऊ शकतो. त्यामुळे या लेखात, चला ! अल निनो या वातावरणातील बदलाच्या संकटाला सोप्या भाषेत समजून घेऊया ! राज्यातील शेतकऱ्यांनी हे बदल समजून घेऊन हवामान व कृषी खात्याच्या सूचनांचे पालन करणे अत्यंत आवश्यक आहे. तसेच सर्वसामान्य नागरिकांनी देखील या संदर्भात पुढील काळाचे नियोजन करणे आवश्यक आहे. चला ! सोप्या भाषेत हा विषय समजून घेऊया !




हवामान बदल, वाढते तापमान, अनियमित पर्जन्यमान आणि नैसर्गिक आपत्ती यामुळे शेती क्षेत्रासमोर नवी आव्हाने उभी राहत आहेत. या आव्हानांमध्ये अल निनो ही जागतिक हवामानाशी संबंधित घटना विशेष महत्त्वाची मानली जाते. जागतिक हवामान संघटना (थचज), भारत हवामान विभाग (खचऊ), संयुक्त राष्ट्रांची अन्न व कृषी संघटना (ऋ-ज) आणि विविध संशोधन संस्थांच्या अभ्यासानुसार अल निनोचा प्रभाव केवळ हवामानापुरता मर्यादित राहत नाही, तर त्याचा परिणाम शेती, जलसंपदा, पशुधन, आरोग्य, जैवविविधता आणि अर्थव्यवस्थेवरही होतो. त्यामुळे या घटनेचे स्वरूप समजून घेणे आणि त्यासाठी पूर्वतयारी करणे अत्यंत आवश्यक आहे.

अल निनो म्हणजे काय?

अल निनो हा स्पॅनिश शब्द असून त्याचा अर्थ लहान मुलगा असा होतो. वैज्ञानिक भाषेत सांगायचे झाल्यास, प्रशांत महासागराच्या मध्य आणि पूर्व भागातील समुद्रपृष्ठाचे तापमान सरासरीपेक्षा जास्त वाढते, तेव्हा अल निनो स्थिती निर्माण होते. ही घटना एछ्छ्ज (एश्र छ्ळ०ं डीींहशीप जीलळश्रश्ररींळेप) या जागतिक हवामान प्रणालीचा भाग आहे.

आता हे कसे होते हे जाणून घेऊया ! समुद्रातील तापमानातील या बदलांमुळे जगभरातील वाऱ्यांचे प्रवाह, ढगांची निर्मिती आणि पर्जन्यमानाचे स्वरूप बदलते. त्यामुळे काही भागात दुष्काळ, तर काही भागात अतिवृष्टीसारख्या घटना घडू शकतात.

अल निनो दरवर्षी येतो का?

नाही. जागतिक हवामान संघटनेच्या माहितीनुसार अल निनो साधारणतः दर दोन ते सात वर्षांनी उद्भवतो. त्याचा कालावधी साधारण नऊ महिने ते एक वर्ष किंवा काही वेळा त्याहून अधिक असू शकतो. प्रत्येक अल निनोची तीव्रता आणि परिणाम सारखेच असतील असे नाही.

भारतावर यापूर्वी काय परिणाम झाला?

भारतातील शेतकरी, पर्यावरण तज्ञ, जलतज्ञ, वनतज्ञ, कृषी तज्ञांसाठी अल निनो हा शब्द आता अपरिचित राहिलेला नाही. भारतातील मान्सून आणि अल निनो यांचा संबंध अनेक दशकांपासून अभ्यासला जात आहे. १९८२, १९८७, २००२, २००९ आणि २०१५ या वर्षांमध्ये भारताने कमी पावसाचा अनुभव घेतला होता. विशेषतः २००२ आणि २००९ मध्ये देशातील अनेक भागांत दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली होती. त्यामुळे गेल्या वर्षी जसा तुफान पाऊस झाला किंवा त्या वर्षापूर्वीही जसा पूरक पाऊस झाला तसा पाऊस यावर्षी नाही ही गोष्ट अगदी स्पष्ट आहे.

तथापि, हवामान तज्ञ स्पष्ट करतात की प्रत्येक अल निनो वर्षात दुष्काळ पडेलच असे नाही. भारतीय महासागरातील तापमान, अरबी समुद्रातील स्थिती, बंगालच्या उपसागरातील कमी दाबाची क्षेत्रे आणि इतर हवामान घटकही मान्सूनवर प्रभाव टाकतात.

हवामान तज्ञांचे काय मत आहे?

जागतिक हवामान संघटना (थचज), भारत हवामान विभाग (खचऊ), संयुक्त राष्ट्रांची अन्न व कृषी संघटना (ऋ-ज) आणि इतर संशोधन संस्थांच्या मते अल निनो हा जागतिक हवामान व्यवस्थेतील नैसर्गिक भाग आहे. मात्र जागतिक तापमानवाढीमुळे त्याचे परिणाम अधिक तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

हवामान तज्ञांच्या मते, अल निनोमुळे जागतिक सरासरी तापमान वाढू शकते. उष्णतेच्या लाटांची तीव्रता वाढू शकते. काही भागात दुष्काळ तर काही भागात अतिवृष्टी होऊ शकते. अन्नसुरक्षा आणि जलसुरक्षेवर परिणाम होऊ शकतो. अशा परिस्थितीत पेरणीच्या नियोजनासाठी हवामान अंदाजांचे महत्त्व अधिक वाढते.

‘अल निनो ‘परिणाम रोखण्यासाठी प्रयत्न

अल निनो ही नैसर्गिक महासागरीय घटना आहे, त्यामुळे यावर्षी अनेक बाबतीत अनियमितता घडू शकते. अशा परिस्थितीत परिणामांची तीव्रता कमी करण्यासाठी विविध उपाययोजना केल्या जातात. साधारणत: अशावेळी शासन स्तरावर हवामानाचा सतत अभ्यास आणि पूर्वसूचना प्रणाली विकसित व कार्यक्षम केली जाते, जलसंधारण प्रकल्प राखीव ठेवले जातात. पीक विमा योजनेचा लाभ घेण्याचे सुचविले जाते. दुष्काळ व्यवस्थापन आराखडे तयार केले जातात, सूक्ष्म सिंचनाला प्रोत्साहन दिले जाते, हवामान आधारित कृषी सल्ला सेवा दिली जाते, बियाणे व चारा उपलब्धतेचे नियोजन करणे, जलाशय व्यवस्थापन आणि पिण्याच्या पाण्याचे नियोजन या काळात शासनामार्फत केले जाते.

शेतकऱ्यांनी काय करावे

शासन स्तरावर हे सर्व निर्णय घेतले जात असताना आपल्या शेतकऱ्यांनी या परिस्थितीत काय करावे यासंदर्भात कृषी तज्ञांनी मार्गदर्शन केले आहे. कृषी तज्ञांच्या मते अल निनोच्या संभाव्य परिणामांचा विचार करून शेतकऱ्यांनी पुढील बाबींकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

१. हवामान अंदाजांवर लक्ष ठेवावे

भारत हवामान विभाग आणि कृषी विभागाच्या अधिकृत सूचनांचे पालन करावे.

२. पीक निवडीचे नियोजन करावे

कमी कालावधीत येणारी आणि कमी पाण्यात तग धरणारी पिके निवडण्याचा विचार करावा.

३. जलसंधारणाला प्राधान्य द्यावे

शेततळे, बांधबंदिस्ती, पावसाचे पाणी साठवणे, चर निर्माण करणे, शेत व शेत रस्त्याच्या मध्ये पाणी साठवणे, ओलसरपणा राहिली, मूलस्थानी जलसंधारणासाठी प्रयत्न करणे.

४. उपलब्ध जलस्तोत्रातून फक्त सूक्ष्म, ठिबक आणि तुषार सिंचनाद्वारे पाण्याचा कार्यक्षम वापर करणे.

५. पीक विमा घ्यावा

नैसर्गिक आपत्तीमुळे होणाऱ्या नुकसानीपासून आर्थिक संरक्षण मिळण्यासाठी हे सर्वात आवश्यक आहे.

६. पशुधन व्यवस्थापन

चारा आणि पाण्याची उपलब्धता याचे पूर्वनियोजन करणे आवश्यक आहे.

७. सर्वात महत्त्वाचे म्हणजे कृषी विभागाने सांगितल्याशिवाय पेरणी न करणे कारण या परिस्थितीत दुबार, तिबार पेरणीची शक्यता असते.

सामान्य नागरिकांनी काय करावे?

अल निनोचा परिणाम केवळ शेतकऱ्यांवरच होतो असे नाही. तर या वातावरणाच्या बदलातून सर्वसामान्य प्रत्येक नागरिकाला जावे लागणार आहे. त्यामुळे हा अल निनो काय हे प्रत्येकाने जाणून घेणे आवश्यक आहे. सामान्य नागरिकांनी अशा परिस्थितीत, पाण्याची बचत करावी,वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन करावे. स्थानिक जलस्रोतांचे संरक्षण करावे. उष्णतेच्या लाटांपासून बचावासाठी आवश्यक काळजी घ्यावी. पर्यावरणपूरक जीवनशैलीचा अवलंब करावा.

कोणत्या देशांवर अल निनोचा प्रभाव ?

अल निनोचा प्रभाव जागतिक स्वरूपाचा असतो. विशेषतः खालील देश यावर्षी अधिक प्रभावित होणार आहे. यामध्ये भारत, ऑस्ट्रेलिया, इंडोनेशिया, अमेरिका, ब्राझील, दक्षिण आफ्रिकेतील काही देश, फिलिपाईन्स, पॅसिफिक महासागरातील बेट राष्ट्रे यांच्यावर अधिक संकट कोसळू शकते. काही भागात दुष्काळ, काही भागात पूर आणि काही ठिकाणी समुद्री परिसंस्थांवर परिणाम दिसून येतो.

भारतातील कोणती राज्ये अधिक संवेदनशील?

अल निनोच्या काळात पावसातील तफावत सर्वाधिक जाणवणाऱ्या राज्यांमध्ये महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगणा, आंध्र प्रदेश, राजस्थान, गुजरात, मध्य प्रदेश आणि छत्तीसगड यांचा उल्लेख केला जातो. तथापि, प्रत्येक वर्षी परिस्थिती वेगळी असू शकते. त्यामुळे या प्रदेशावर अधिक लक्ष भारतीय हवामान खात्याने केले असून त्या दृष्टीने नियोजन सुरू आहे.

मृग बरसला नाही म्हणजे अल निनोचा प्रभाव

हे उत्तर सध्या नाही असे आहे. कारण भारतात अनेक वेळा उशिरा पावसाला सुरुवात होते. भारतीय हवामान विभागाच्या मते मान्सूनचे आगमन आणि त्यातील खंड अनेक घटकांवर अवलंबून असतात. अरबी समुद्रातील परिस्थिती, बंगालच्या उपसागरातील कमी दाबाची क्षेत्रे, पश्र्चिमी वारे, स्थानिक तापमान आणि इतर महासागरीय घटक यांचाही प्रभाव असतो.

म्हणूनच जून महिन्यात काही दिवस पाऊस उशिरा येणे किंवा खंड पडणे यामागे केवळ ‘अल निनो ‘च कारणीभूत आहे, असे निश्र्चितपणे म्हणता येत नाही. तथापि यासंदर्भात हवामान शास्त्रज्ञांनी यावर्षी पाऊस उशिरा होईल अशी सूचना केली आहे. ‘अल निनो ‘ च्या प्रभावाबाबत काही कालावधीनंतर हवामान खाते मत व्यक्त करणार आहे तथापि,पाऊस उशिरा येणार हे निश्र्चित.त्यामुळे,अधिकृत हवामान विभागाच्या निरीक्षणांवर विश्र्वास ठेवणे आवश्यक आहे.

शासनाच्या काय उपाय योजना सुरू आहे

महाराष्ट्र शासनाने जलयुक्त शिवार, जलसंधारण प्रकल्प, सूक्ष्म सिंचन प्रोत्साहन, पीक विमा, हवामान आधारित कृषी सल्ला आणि दुष्काळ व्यवस्थापन यांसारख्या उपाययोजनांवर भर दिला आहे. शासन सातत्याने हवामान परिस्थितीवर लक्ष ठेवून आहे. राज्य शासनाने संभाव्य जल संकटामुळे धरणातील पाणी पिण्यासाठीच राखीव ठेवण्याची महत्त्वाची सूचना केली आहे. सिंचनासाठी पाणी उपसा बंदी लागू केली आहे. धरणातून कालव्यातून नद्या आणि तलावांमधून होणाऱ्या अधिक अनधिकृत व बेकायदेशीर पाणी उपसा तातडीने बंद करण्याचे निर्देश दिले आहे. तसेच वेळोवेळी आवश्यकतेनुसार जिल्हास्तरावर मार्गदर्शक सूचना जारी करण्यात येणार आहे.

मुख्यमंत्र्यांकडून शेतकऱ्यांना सूचना

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यासंदर्भात हवामान विभाग व राज्याच्या व केंद्राच्या कृषी विभागाशी सल्लामसलत करून शेतकऱ्यांसाठी पेरणीची घाई न करण्याच्या संदेश दिला आहे. अल निनो मुळे पावसात खंड पडू शकतो. त्यामुळे शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये, कृषी विभागाच्या सल्ल्यानेच पेरणी करावी, अशी सूचना त्यांनी केली आहे. शेतकऱ्यांनी घाबरून न जाता अधिकृत हवामान अंदाज, कृषी विद्यापीठांचे मार्गदर्शन आणि कृषी विभागाच्या सूचनांच्या आधारे निर्णय घेण्याचे आवाहन केले आहे.

थोडक्यात,अल निनो ही जगभर परिणाम घडवणारी नैसर्गिक हवामान घटना असली तरी ती अटळ संकट नाही. विज्ञानाधारित नियोजन, अचूक हवामान अंदाज, जलसंधारण, आधुनिक शेती तंत्रज्ञान आणि शासन-जनसहभाग यांच्या मदतीने तिच्या परिणामांची तीव्रता मोठ्या प्रमाणात कमी करता येते. शासनाकडून होणाऱ्या वेळोवेळी सूचना भीती निर्माण करण्यासाठी नाहीत. तर जागरूकता वाढविण्याची आहे. शाश्र्वत जलव्यवस्थापन, पर्यावरण संरक्षण आणि हवामान अनुकूल शेती हीच अल निनोसारख्या आव्हानांना सामोरे जाण्याची सर्वात प्रभावी दिशा ठरू शकते. त्यामुळे शेतीच्या कोणत्याही कामाला सुरुवात करण्यापूर्वी कृषी विभागाच्या व हवामान विभागाच्या सूचनांचे पालन करणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांनी त्यासाठी सतर्क असणे सर्वात महत्त्वाचे आहे.

**प्रवीण टाके**
**उपसंचालक (माहिती)**

# लातूर पोलिसांचा ऐतिहासिक सामाजिक उपक्रम; ३१०४ रक्तपिशव्यांचे संकलन करुन राज्यासमोर आदर्श निर्माण

लातूर : कायदा व सुव्यवस्था राखण्याबरोबरच समाजाप्रती असलेली आपली बांधिलकी जपत लातूर जिल्हा पोलीस दलाने एक ऐतिहासिक विक्रम आपल्या नावावर नोंदविला आहे. पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या दूरदृष्टीपूर्ण संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेल्या भव्य रक्तदान शिबिरामध्ये तब्बल ३१०४ रक्तपिशव्यांचे संकलन करण्यात आले असून हा उपक्रम लातूर जिल्हा पोलीस दलाच्या इतिहासातील मैलाचा दगड ठरला आहे.

लातूर जिल्हा पोलीस, इंडियन रेडक्रॉस सोसायटी संचलित डॉ. भालचंद्र ब्लड सेंटर, लातूर तसेच रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊन यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आलेल्या या उपक्रमाला जिल्हाभरातील पोलीस अधिकारी, कर्मचारी, होमगार्ड जवान आणि नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांनी या सामाजिक अभियानात सहभाग घेत रक्तदानाच्या माध्यमातून हजारो गरजू रुग्णांना जीवनदान देण्याचा संकल्प प्रत्यक्षात उतरविला.

विशेष म्हणजे या रक्तदान शिबिराची सांगड रस्ते सुरक्षा अभियानाशी घालण्यात आली. रक्तदान करणाऱ्या प्रत्येक रक्तदात्यास मोफत हेल्मेट देण्यात आले. त्यामुळे रक्तदानासारख्या पवित्र कार्यासोबतच हेल्मेट वापराबाबत जनजागृती निर्माण झाली. अपघातांमधील मृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी हेल्मेट वापरण्याचा संदेश या माध्यमातून प्रभावीपणे समाजापर्यंत पोहोचला.

भादा पोलीस स्टेशनने २५२ रक्तपिशव्या संकलित करून जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला, तर उदगीर, रेणापूर, गांधी चौक, किनगाव, जळकोट, चाकूर, वाढवणा,



एमआयडीसी आणि औसा पोलीस स्टेशनसह सर्वच घटकांनी उल्लेखनीय योगदान दिले. पोलीस दलातील सामाजिक जाणीव, संघटनशक्ती आणि जनहितासाठीची तळमळ या उपक्रमातून अधोरेखित झाली.

उन्हाळा काळात रक्तसाठ्याचा तुटवडा जाणवत असताना लातूर पोलिसांनी उचललेले हे पाऊल हजारो रुग्णांसाठी वरदान ठरणार आहे. अपघातग्रस्त, शस्त्रक्रियेसाठी दाखल असलेले रुग्ण, थॅलेसेमिया ग्रस्त बालके आणि गंभीर आजारांशी झुंज देणाऱ्या अनेक रुग्णांना या रक्तसाठ्याचा थेट लाभ मिळणार आहे.

पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या नेतृत्वाखाली लातूर पोलीस दलाने गेल्या काही महिन्यांत समाजाभिमुख उपक्रमांची मालिका राबविली आहे. रक्तदान शिबिराच्या या अभूतपूर्व यशामुळे लातूर पोलीस दलाची प्रतिमा केवळ कायद्याचे रक्षक म्हणून नव्हे, तर समाजहितासाठी सदैव तत्पर असलेल्या संवेदनशील आणि जबाबदार यंत्रणा म्हणून अधिक उंचावली आहे.

पोलीस आणि जनता यांच्यातील नाते अधिक दृढ करण्याबरोबरच समाजातील प्रत्येक घटकापर्यंत मदतीचा हात पोहोचविणे हेच या उपक्रमामागील उद्दिष्ट आहे, अशी भावना व्यक्त करत पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी रक्तदान करणाऱ्या सर्व रक्तदाते, पोलीस अधिकारी, कर्मचारी, होमगार्ड जवान आणि सहकार्य करणाऱ्या संस्थांचे विशेष अभिनंदन केले.

लातूर जिल्हा पोलीस दलाने राबविलेला हा विक्रमी उपक्रम सामाजिक उत्तरदायित्व, मानवता आणि जनसेवेचा आदर्श नमुना ठरत असून राज्यातील इतर पोलीस दलांसाठीही प्रेरणादायी ठरणार आहे.

पोलीस ठाणेनिहाय रक्तपिशव्यांचे संकलन पुढीलप्रमाणे झाले.*

पोलीस अधीक्षक कार्यालय – १६५, गांधी चौक पोलीस स्टेशन – १७७, एमआयडीसी पोलीस स्टेशन – १३८, विवेकानंद चौक पोलीस स्टेशन – १३२,

लातूर ग्रामीण पोलीस स्टेशन – ११७, उदगीर पोलीस स्टेशन – २२५,

वाढवणा पोलीस स्टेशन – १५१, अहमदपूर पोलीस स्टेशन – ७१,

शिरूर अनंतपाळ पोलीस स्टेशन – ६०, साकोळ पोलिस दूरक्षेत्र – ५३,

जळकोट पोलीस स्टेशन – १६१,

एकुरगा रोड दूरक्षेत्र– २६,

निलंगा पोलीस स्टेशन – ४३,

किनगाव पोलीस स्टेशन – १७१,

रेणापूर पोलीस स्टेशन – २०७,

चाकूर पोलीस स्टेशन – १५५,

औराद शहाजनी पोलीस स्टेशन – १२१, होमगार्ड बाभळगाव – ८२,

औसा पोलीस स्टेशन – १३४, कासारशिरसी पोलीस स्टेशन – १०२, मुरूड पोलीस स्टेशन – १०३,

गातेगाव पोलीस स्टेशन – ५१,

किल्लारी पोलीस स्टेशन – ११२,

भादा पोलीस स्टेशन – २५२ आणि

देवणी पोलीस स्टेशन – ८४

रया सर्व घटकांच्या एकत्रित प्रयत्नांतून तब्बल ३१०४ रक्तपिशव्यांचे संकलन करण्यात आले.

## ऑपरेशन टायगरमागे भाजपा, शिवसेना नव्हे तर उबाठातील अंतर्गत राजकारणच

मुंबई : 'ऑपरेशन टायगर'शी भाजपा आणि शिवसेनेचा



काहीही संबंध नाही तर 'ऑपरेशन टायगर' उबाठातील अंतर्गत शीतयुद्ध आणि वादामुळे होत आहे. संजय राऊत ज्या पद्धतीची भाषा वापरतात, त्यामुळेच हे घडत आहे. संजय राऊत, तुम्हाला तुमचे खासदार तुमच्यासोबत ठेवता येत नाहीत, तुम्हाला तुमचे विचार तुमच्यासोबत ठेवता येत नसल्याने उबाठा गटाची ही अवस्था झाली आहे. हा काही बांगलादेश किंवा पाकिस्तान नाही. तुमची दादागिरी इथे सहन केली जाणार नाही. तुम्ही कोणाला धमकावत असाल तर जशास तसे उत्तरही दिले जाईल, असा घणाघात भाजपा प्रदेश मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांनी बुधवारी केला.भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

संजय राऊत यांना अश्र्लील शब्द वापरण्याची सवय आहे. कमरेखालचे शब्द वापरायचे, लोकांना शिव्या द्यायच्या. त्यांच्या याच भाषेवर महाराष्ट्रातील जनता रोज थुंकते आणि त्यांची रोज इज्जत काढते. परंतु ज्यांची इज्जत संपलेली असते त्यांना त्याचे काहीही पडलेले नसते. त्यांनी रोज असे शब्द वापरणे, अजून काही म्हणणे, यात काही नवीन नाही, अशा शब्दात श्री. बन यांनी फटकारले.

श्री. बन पुढे म्हणाले, आई–बाबा आणि साईबाबांची शपथ घेऊन माणसे टिकवता येत नाहीत, पक्ष वाढवता येत नाही. वंदनीय हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांवर निष्ठा ठेवली असती तर संजय राऊत आणि उद्धव ठाकरे यांच्यावर ही वेळ आली नसती. लोक का सोडून जात आहेत? कारण तुम्ही आपल्या वडिलांचे विचार सोडले, हिंदुत्वाचे विचार सोडले आणि काँग्रेसच्या दावणीला जाऊन बसलात. येत्या काळात उबाठा गटाची आणि संजय राऊत यांची यापेक्षाही वाईट अवस्था होणार आहे. मुळात टायगर कोण आहे आणि शेळी कोण आहे, हे महाराष्ट्रातील जनतेने दाखवून दिले आहे. संजय राऊत, आता गाढव नाक्यावर गाढवपणा करणे एवढेच तुमच्याकडे शिल्लक आहे.

संजय राऊत कोणाच्या जोरावर निवडून आले? एकनाथजी शिंदे यांच्या मतांवर ते राज्यसभेवर निवडून आले. एकनाथजी शिंदे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी मतदान केले नसते तर ते राज्यसभेचे खासदार झाले नसते. हिंमत असेल तर त्यांनी सांगावे, 'मी एकनाथजी शिंदे यांची मते नाकारतो. त्यांच्या मतांवर मला खासदार राहायचे नाही. माझी दोन वर्षांची खासदारकी शिल्लक आहे. मी तोंडावर राजीनामा फेकतो.' आपल्या बुडाखाली किती अंधार आहे तो पहा. तुम्ही शिवसेनेच्या मूळ खासदारांच्या, मूळ आमदारांच्या जीवावर खासदार झालात. तेही अर्ध्या मताने निवडून आलात. त्यामुळे एकनाथजी शिंदे यांच्या मतांवर खासदार झाले त्यांनी आधी आपला राजीनामा दिला पाहिजे. राज्यसभेचे सदस्यत्व नाकारले पाहिजे आणि मग वर तोंड करून इतरांचे राजीनामे मागितले पाहिजेत. तोपर्यंत राऊत यांना इतरांचा राजीनामा मागण्याचा अधिकार नाही, असेही श्री. बन यांनी सुनावले.

## भिवंडीत राज्य उत्पादन शुल्क विभागाची मोठी कारवाई; १ कोटी ९० लाखांचा मुद्देमाल जप्त

मुंबई, दि . १७: परराज्यातून होणाऱ्या अवैध मद्य वाहतुकीविरोधात राज्य उत्पादन शुल्क विभागाने धडक मोहीम राबवून मोठी कारवाई केली आहे. भिवंडी येथील मुंबई – नाशिक हायवेवरील वडपे गावच्या कमानीसमोर सापळा रचून तब्बल १ कोटी ९० लाख ३५ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. यामध्ये गोवा राज्यात विक्रीसाठी असलेल्या विदेशी मद्याचा साठा आणि एक ६ चाकी कंटेनर ट्रक समाविष्ट आहे.

राज्य उत्पादन शुल्क विभागाला मिळालेल्या माहितीनुसार, गोवा राज्यातून बेकायदेशीररित्या विदेशी मद्याची वाहतूक केली जात होती. त्यानुसार भिवंडी विभाग ठाणे–२ च्या पथकाने वडपे गावाजवळ पाळत ठेवून संशयित अशोक लेलँड ६ चाकी कंटेनर (क्रमांक क्ठ–६१ ऋ–१५०८) थांबवला.




वाहनाची झडती घेतली असता, त्यात गोव्यातील नामांकित मद्याच्या तब्बल ७७,७६० सीलबंद बाटल्या (१,६२० बॉक्स) आढळून आल्या. याबाबत हनुमान मोबता राम (वय २८ वर्षे, रा. पिरु का तला, सेदवा, बाडमेर, राजस्थान) याला अटक करण्यात आली आहे.

जप्त केलेल्या मुद्देमालमध्ये विदेशी मद्याच्या ७७,७६० सीलबंद बाटल्या त्याची किंमत १ कोटी ६३ लाख २९ हजार ६०० रुपये, अशोक लेलँड कंपनीचे ६ चाकी कंटेनर किंमत २७ लाख रुपये आणि एक मोबाईल त्याची किंमत किंमत ६ हजार रुपये यांचा समावेश आहे.

ही यशस्वी कारवाई राज्य उत्पादन शुल्क आयुक्त डॉ. राजेश देशमुख, ठाणे जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ, सह आयुक्त (अंमलबजावणी व दक्षता) प्रसाद सुर्वे, कोकण विभागाचे विभागीय उप आयुक्त प्रदीप पवार आणि ठाणे–२ चे अधीक्षक उत्तम शिंदे, उपअधीक्षक अभिजित देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

या पथकात भिवंडी विभागाचे निरीक्षक सुभाष एस. खंडेराय, दिपक परब, तसेच दुय्यम निरीक्षक संजय वाकचौरे, आप्पा चव्हाण, सहाय्यक दुय्यम निरीक्षक अर्जुन कापडे आणि जवान सर्वश्री नारायण जानकर, गणेश पाटील, सचिन पवार, निलेश तायडे, व स्वरुपा भोसले यांचा समावेश होता. या गुन्ह्याचा पुढील तपास निरीक्षक सुभाष खंडेराय करीत आहेत.

नागरिकांना जाहीर आवाहन

राज्य उत्पादन शुल्क विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, आपल्या परिसरात अशा प्रकारे अवैध व बेकायदेशीर मद्याची निर्मिती किंवा वाहतूक होत असल्यास तात्काळ टोल फ्री १८००२३३९९९९ वर अथवा लँडलाईन क्रमांक ०२२–२०८२२४८८ वर संपर्क साधून माहिती द्यावी. माहिती देणाऱ्याचे नाव पूर्णपणे गुप्त ठेवण्यात येईल.

# दुर्गम भागातील ७ आरोग्य योद्ध्यांचा राज्यस्तरीय सन्मान सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते गौरव

मुंबई, दि. १७ : नंदुरबार जिल्ह्यातील अक्कलकुवा व धडगाव या अतिदुर्गम आदिवासी भागांमध्ये प्रतिकूल परिस्थितीत कार्यरत राहून आरोग्य सेवेचा दीप अखंड तेवत ठेवणाऱ्या सात आरोग्य योद्ध्यांचा सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते शाल, पुष्पगुच्छ आणि प्रशस्तीपत्र देऊन विशेष सन्मान करण्यात आला.

आरोग्य भवन, मुंबई येथे आयोजित आढावा बैठकीदरम्यान दुर्गम भागातील आरोग्य सेवेची वस्तुस्थिती समोर आणणाऱ्या आणि आपल्या कार्यातून उल्लेखनीय परिणाम साधणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा गौरव करण्यात आला. बैठकीस आमदार चित्रा वाघ, आरोग्य आयुक्त डॉ. सुनिल भोकरे, संचालक डॉ. विजय कंदेवाड, आरोग्य विभागातील इतर वरिष्ठ अधिकारी, उपसंचालक डॉ.कपिल अहेर, नंदुरबार जिल्ह्यातील वरिष्ठ आरोग्य अधिकारी तसेच अक्कलकुवा व धडगाव येथील आरोग्य अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते. या सन्मानाचा उद्देश दुर्गम भागात कार्यरत आरोग्य कर्मचाऱ्यांचे मनोबल उंचावणे, त्यांच्या कार्याला सार्वजनिक मान्यता मिळवून देणे आणि इतर कर्मचाऱ्यांनाही प्रेरणा देणे हा आहे.

सन्मानित अधिकारी व कर्मचारी :

१. डॉ. गुणवंत कांबळे, वैद्यकीय अधीक्षक, ग्रामीण रुग्णालय मोलगी २. डॉ. कांतीलाल पावरा, तालुका आरोग्य अधिकारी, धडगाव ३. डॉ. संतोष परमार, स्त्रीरोग तज्ज्ञ, ग्रामीण रुग्णालय धडगाव ४. डॉ. राहुल नायका, वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र मांडवा ५. डॉ. हिमांशू चव्हाण, वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र रोषमाळ खुर्द ६. चमेली भताने, अधिपरिचारिका, प्राथमिक आरोग्य केंद्र डाब ७. अंजना परमार,




आरोग्य सेविका, तरंगता दवाखाना (बोट ॲम्ब्युलन्स), धडगाव माता व बाल आरोग्यासाठी उल्लेखनीय योगदान

डॉ. गुणवंत कांबळे यांनी २०१४ पासून दुर्गम व आदिवासी भागात सेवा बजावताना माता व बाल आरोग्य क्षेत्रात विशेष कार्य केले आहे. प्रसूती व स्त्रीरोग विषयातील पदव्युत्तर पदविका प्राप्त केल्यानंतर त्यांनी नंदुरबार जिल्हा महिला व बालरुग्णालयात तसेच ग्रामीण रुग्णालय मोलगी येथे उच्च जोखमीच्या गर्भवती मातांना तज्ज्ञ सेवा उपलब्ध करून दिल्या. त्यांच्या नेतृत्वाखाली ग्रामीण रुग्णालय मोलगी येथे उच्च जोखमीच्या प्रसूतींची संख्या ७४० वरून ९८० पर्यंत वाढली असून संस्थात्मक प्रसूतीचे प्रमाण सुमारे ३० टक्क्यांनी वाढले आहे. परिणामी घरगुती प्रसूती कमी होऊन माता मृत्यू कमी करण्यास मोठी मदत झाली आहे.

रस्ते दुर्गम असले तरी सेवेचा मार्ग सुकर

प्राथमिक आरोग्य केंद्र मांडवा येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. राहुल नायका यांनी गेल्या पाच वर्षांत माता मृत्यूदर कमी करण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न केले आहेत. आशा स्वयंसेविका, आरोग्य कर्मचारी आणि ग्रामस्थांच्या सहभागातून संस्थात्मक प्रसूतीचे प्रमाण वाढविण्यात त्यांना यश आले असून मागील दोन वर्षांत त्यांच्या कार्यक्षेत्रात एकही माता मृत्यू होऊ दिलेला नाही. दुर्गम भागातील नागरिकांचा आरोग्य व्यवस्थेवरील विश्र्वास दृढ करण्यात त्यांचे योगदान उल्लेखनीय आहे.

कुपोषण, सिकलसेल आणि आपत्कालीन सेवेत विशेष कार्य

प्राथमिक आरोग्य केंद्र रोषमाळ खुर्द येथील डॉ. हिमांशू चव्हाण यांनी कुपोषण कमी करणे, सिकलसेलग्रस्त रुग्णांचे समुपदेशन व उपचार, उच्च जोखमीच्या गर्भवती मातांचे व्यवस्थापन तसेच असंसर्गजन्य आजारांवरील उपचार यामध्ये विशेष कामगिरी केली आहे. मागील दोन वर्षांत ४० हून अधिक सर्पदंश आणि १५ हून अधिक विंचूदंश रुग्णांचे प्राण वाचविण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. तसेच अतिदुर्गम भागात जाऊन वैद्यकीय व न्यायवैद्यक सेवाही प्रभावीपणे दिल्या आहेत.

दुर्गम आदिवासी भागातील मातृआरोग्य सेवेसाठी दोन दशकांची समर्पित सेवा

ग्रामीण रुग्णालय धडगाव येथील स्त्रीरोग व प्रसूती तज्ज्ञ डॉ. संतोष नथमल परमार हे सन २००४ पासून शासकीय आरोग्य सेवेत कार्यरत असून गेल्या दोन दशकांहून अधिक काळ त्यांनी दुर्गम आदिवासी भागातील माता व बाल आरोग्य सेवा बळकट करण्यासाठी उल्लेखनीय योगदान दिले आहे.

त्यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामीण रुग्णालय धडगाव येथे दरमहा सुमारे १५० ते २०० संस्थात्मक प्रसूतींचे यशस्वी व्यवस्थापन केले जाते.

आदिवासी भागातील आरोग्य सेवेचे प्रभावी नेतृत्व

धडगावचे तालुका आरोग्य अधिकारी डॉ. कांतीलाल शिवाजी पावरा हे मागील २३ वर्षांपासून आदिवासी व अतिदुर्गम भागात सेवा बजावत आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली धडगाव तालुक्यात संस्थात्मक प्रसूतीचे प्रमाण वाढले असून माता मृत्यूदरात लक्षणीय घट झाली आहे. मानव विकास अभियान, १०२ रुग्णवाहिका सेवा, आशा स्वयंसेविकांचे सक्षमीकरण आणि उच्च जोखमीच्या गर्भवतींचे प्रभावी व्यवस्थापन यामुळे माता–बाल आरोग्य सेवांना बळकटी मिळाली आहे.

कुटुंब नियोजन कार्यक्रमांतर्गत पुरुष नसबंदी मोहिमेत उद्दिष्टाच्या २०० टक्क्यांहून अधिक कामगिरी करून धडगाव तालुक्याने राज्यात अग्रक्रम मिळविला आहे.

सेवाभावाची प्रेरणादायी कहाणी

प्राथमिक आरोग्य केंद्र डाब येथील अधिपरिचारिका चमेली भताने या गेल्या नऊ वर्षांपासून मुख्यालयी वास्तव्यास राहून रात्रंदिवस सेवा बजावत आहेत. त्यांनी आतापर्यंत ९८५ संस्थात्मक प्रसूती यशस्वीपणे हाताळल्या असून प्रसूती सेवा, आपत्कालीन सेवा आणि रुग्णसेवेमध्ये त्यांचे योगदान विशेष आहे. दुर्गम भागातील महिलांना सुरक्षित मातृत्वाचा आधार देण्यात त्यांचा मोठा वाटा आहे.

नर्मदेच्या लाटांवर आरोग्य सेवेची जीवनदायिनी

धडगाव तालुक्यातील नर्मदा नदीकाठच्या दुर्गम वस्त्यांमध्ये कार्यरत असलेल्या तरंगत्या दवाखान्याच्या आरोग्य सेविका अंजना परमार यांचे कार्य विशेष प्रेरणादायी आहे. रस्ते नसलेल्या आणि अनेकदा केवळ जलमार्गानेच पोहोचता येणाऱ्या गावांमध्ये त्या बोट ॲम्ब्युलन्सच्या माध्यमातून नियमित आरोग्य सेवा पोहोचवितात.

गर्भवती माता, नवजात बालके, लसीकरणासाठी पात्र बालके, सिकलसेल रुग्ण आणि वृद्ध नागरिक यांच्यापर्यंत आरोग्य सेवा पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य त्या करीत आहेत. पावसाळ्यात नदीला पूर आलेला असतानाही जीव धोक्यात घालून दुर्गम वस्त्यांमध्ये आरोग्य तपासणी, औषध वितरण, समुपदेशन आणि रेफरल सेवा देण्याचे कार्य त्यांनी सातत्याने केले आहे. अनेक गंभीर रुग्णांना वेळेत उपचारासाठी स्थलांतरित करून जीव वाचविण्यात त्यांचे मोलाचे योगदान राहिले आहे.

दुर्गम भागातील कर्मचाऱ्यांना प्रेरणा

यावेळी सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर म्हणाले, दुर्गम भागात सेवा देणारे आरोग्य कर्मचारी हे आरोग्य व्यवस्थेचे खरे आधारस्तंभ आहेत. अनेक अडचणी, प्रतिकूल परिस्थिती आणि मर्यादित साधनसामग्री असूनही ते नागरिकांपर्यंत आरोग्य सेवा पोहोचवत आहेत. त्यांचे कार्य केवळ प्रशंसनीय नाही तर संपूर्ण आरोग्य यंत्रणेसाठी प्रेरणादायी आहे. शासन त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे आहे.

या सन्मानामुळे नंदुरबारसह राज्यातील दुर्गम भागात कार्यरत हजारो आरोग्य अधिकारी, कर्मचारी, परिचारिका, आशा स्वयंसेविका आणि समुदाय आरोग्य कर्मचाऱ्यांना नव्या जोमाने काम करण्याची प्रेरणा मिळेल, असा विश्र्वास व्यक्त करण्यात आला.

हे पत्रक, मालक, संपादक, प्रकाशक रघुनाथ बनसोडे यांनी मुद्रक महेश मोतीराम राठोड यांनी मयूर ऑफसेट प्रिंटर्स, मेन रोड, मित्र नगर, लातूर, जि.लातूर – ४१३ ५१२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक लातूर प्रभात, पवन कॉलनी, कृपासदन शाळेजवळ, लातूर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
संपादक – रघुनाथ वाघोजी बनसोडे, मो.८८३०२५०६४५
(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकाची जबाबदारी)
RNI No.: - MAHMAR/2017/72894